किल्ले सिंधुदुर्ग



माधुरी नाईक
अरविंद नाईक

किल्ले सिंधुदुर्ग

माधुरी नाईक

अरविंद नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव किल्ले सिंधुदुर्ग

प्रकार : दुर्ग दर्शन

लेखक : माधुरी नाईक, अरविंद नाईक B.E.

ई-मेल : madhuri.jadhav26@yahoo.in

सर्व फ़ोटो: माधुरी नाईक, अरविंद नाईक

या पुस्तकातील लेखनाचे व फ़ोटोंचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन: ई साहित्य प्रतिष्ठान, १९ फ़ेब्रुवारी २०१५
www.esahity.com
esahity@gmail.com

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2015

भारताच्या सागरी सीमांचं रक्षण करणाऱ्या

सुसज्ज आणि समर्थ नौदलाला

हे पुस्तक समर्पित

माधुरी नाईक

अरविंद नाईक

कोकणातल पर्यटन म्हटलं की चटकन इथले स्वच्छ–सुंदर समुद्रकिनारे डोळ्यांसमोर येतात. फेसाळते व रमणीय सागर किनारे, रूपेरी वाळू, माडांची बने व डोंगर-दऱ्या हीच कोकणची खरी ओळख. त्याचबरोबर कोकणातील अनेक पुरातन आणि प्राचीन मंदिरही प्रसिद्ध आहेत. संपुर्ण कोकण फिरण्यासाठी बरेच काही आहे. पण तुम्ही पावसाळ्यात कोकणात कुठेही कुठल्याही गावी जा छानच वाटते. थंडगार वातावरण, हिरवी हिरवी शेते, सर्वत्र शांतता, गोंगाट कलकलाट फ़ार कमी. असा पुर्ण कोकण आपण आरामात फिरुया. सध्यातरी मालवणचा सिंधुदुर्ग किल्ला बघुया.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाचे मुख्य आकर्षण असलेला मालवण गावाजवळील सिधुंदुर्ग किल्ला हा जवळपास सर्वानाच माहित आहे. सर्व बांजुनी पाण्याने वेढलेले नऊ जलदुर्ग पश्चिम किनाऱ्याजवळ आहेत. अर्नाळा, घारापुरी, खांदेरी, उंदेरी, कुलाबा, पद्मदुर्ग, मुरुडचा जंजिरा,

सुवर्णदुर्ग, आणि सिंधुदुर्ग. यापैकी खांदेरी-उंदेरीची सफ़र आपण ह्या पुर्वी केलेली आहे. चला तर आता या भव्य दिव्य सिधुंदुर्ग किल्ल्याची सफ़र करुया.

"चौऱ्याऐंशी बंदरी ऐसा जागा नाही" हे उद्गार खुद्द शिवाजीमहाराजांनी ज्या किल्ल्याविषयी काढले तो म्हणजे सिंधुदुर्ग. मालवणच्या किनाऱ्यावर उभे राहुन समोरच्या **'कुरटे'** बेटावर अजिंक्य जलदुर्ग उभारण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं आणि मराठी आरमाराला बळ देणारा सिंधुदुर्ग उभारला. फिरंगी या मातीत पाय रोऊ शकले याच कारण त्यांची समुद्रावर सत्ता होती. हे शिवरायांनी ओळखलं होत. सागरी आरमार आणि सागरी तटबंदी यांचे महत्त्व उमगलेले शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने पहिले राजे होते. त्यांनी केलेली सागरी आरमाराची सुव्यवस्था पाहून महाराजांच्या मोठेपणाची आणि एक सजग राजा असण्याची प्रचिती येते. महाराजांचे स्वत:चे सागरी आरमार होते आणि मुंबईपासुन गोव्यापर्यंतच्या पट्ट्यावर त्यांच्या आरमाराचे वर्चस्व होते. या मराठा आरमारामुळेच सागरी मार्गाने येणाऱ्या ब्रिटिश, डच आणि पोर्तुगीज ह्यांच्यावर ते

नियंत्रण ठेवु शकले. जंजिऱ्याचा सिद्दी, उत्तरेकडचा इंग्रज आणि गोव्याचा पोर्तुगीज यांना आव्हान देणारा बलाढ्य़ किल्ला उभारुन त्यांनी समुद्रावर मराठी आरमाराचं वर्चस्व निर्माण केलं.

गेले चारशे वर्ष हा ओजस्वी इतिहास सांगत सिधुंदुर्ग मालवणच्या समुद्रात उभा आहे. किल्ल्याचं किनाऱ्यापासून हे अंतर दिड किलोमीटर आहे. खडकाळ समुद्रातुन वाट काढत किल्ल्यापर्यंत जाण्याचं कसब या होडीवाल्यांनी साध्य केलंय. दुर्ग बांधणे व ते जतन करणे ही फ़ारच खर्चिक बाब असे. एकटा सिंधुदुर्ग आकाराला येण्यासाठी एक कोटी होन खर्च झाला होता. पाचशे पाथरवट , दोनशे लोहार शिवाय शंभर गोवेकर पोर्तुगिज आणि तीन हजार मजुर, तीन वर्ष एकसारखे खपत होते. पायाचे दगड पाचखडी शिशाच्या रसात बसविले, तेव्हा कुठे हा शिवलंका सिंधुदुर्ग उभा राहिला. सर्वच गडांना इतका खर्च येत नसे. पण असा दुर्ग पाण्यात उभारणॆ ही सोपी

गोष्ट नव्हती. किल्ल्याचे बांधकाम गोंविद विश्वनाथ प्रभुच्या देखरेखीत झाले. या किल्ल्यास अजिंक्य बनवण्यासाठी आसपास अनेक उपदुर्ग उभारण्यात आले. या दुर्गामुळे संपुर्ण क्षेत्र सुरक्षित झाले.

चला तर सफ़र करुया शिवलंका सिंधुदुर्गाची !

किल्ल्यावर जाण्यासाठी होडीची सोय केलेली आहे. किल्ल्यात जाण्यासाठी बंदर जेटीवरुन सुमारे ३५ ते ४० प्रवासी होड्या ही सेवा पुरवतात. इथे प्रतिमाणशी ३७ रुपये भरुन अगोदर तिकिट घ्यावे लागते व नंतर होडीत जाता येते. ही होडी किल्ल्याबाहेर दरवाजापाशी आपल्याला सोडते. साधारण एक तासाच्या कालावधीने परत यायचे असते. किल्ल्याच्या बाहेर निरनिराळ्या वस्तु विकायला आहेत. त्यामधे शंखशिंपल्यांच्या शोभेच्या वस्तु, नारळापासुन बनविलेले वेगवेगळे शो-पिस सर्व अगदी मस्तच आहे. निरनिराळ्या प्रकारच्या टोप्या इथे दिसतात. इथे गोव्यातुन बाईकवर येणारे विदेशी पर्यटक देखील नजरेस पडतात. होडीत बसल्यावर आपल्याला एका बाजुचा दांडी भागाचा व दुसऱ्या बाजुला राजकोट या भुईकोटापर्यंत चंद्रकोरीसारख्या रमणीय सागरकिनारा दिसेल. किल्ल्याच्या जवळ जाताच सिंधुदुर्गासमोरच झेंडे लावलेले पडके बांधकाम

दिसेल तो म्हनजे पद्मदुर्ग होय.शिवकालातील ही गोदी होती. येथे जहाज बांधणी व दुरुस्तीची कामे केली जात असत. सध्या येथे एक छोटे वेताळ मंदिर आणि काही तटबंदी आहे.

मुहुर्ताचा धोंडा :-

दांडी किनाऱ्यावर दांडेश्वर मंदिरानजीक ' मुहुर्ताचा धोंडा ' हा ' मोरयाचा धोंडा 'ह्या नावाने ओळखला जातो. हा जांभळट रंगाचा खडक आहे. त्यावर गणपती, शिवलिंग, नंदी, चंद्र,सुर्य इ. कोरलेल्या आहेत. येथेच २५ नोव्हेंबर १६६४ रोजी ब्राम्हणांच्या साक्षीने सागरपूजन व किल्ला बांधकामाचा शिलान्यास झाला. त्या काळी मुहुर्ताचे कार्य करणाऱ्या भटजींनी समुद्रप्रवास करू नये असा संकेत होता. त्यामुळे कुरटे बेटावर जाऊन भुमिपूजन न करता मोरयाच्या धोंड्यावरुन भुमिपूजन करुन मुहुर्त केला होता. किल्ल्यांचे बांधकाम २९ मार्च १६६७ रोजी पूर्ण झाले. त्यावेळी वास्तुशांती समारंभ महाराजांच्या उपस्थितीत झाला. बांधकाम गोविंद विश्वनाथ प्रभु यांच्या देखरेखीखाली हिरोजी इंदुलकर यांनी करवुन घेतले.

नौदलाने या दिनाचे व घटनेचे औचित्य साधून **‘ आय. एन. एस. सिंधुदुर्ग ’** असे एका युद्धनौकेचे नामकरण केले आहे तसेच दरवर्षी २५ नोव्हेंबर हा दिवस या बोटीवर विशेष साजरा केला जातो.

दुर्मिळ दोन फांद्यांचा माड :-

शिवराजेश्वर मंदिराकडे जाण्याच्या मार्गावरच पुर्वी लवकर असा न दिसणारा दोन फांद्याचा माड होता. हल्लीच या माडावर वीज पडल्यामुळे हा माड गतस्मृतीत गेला आहे.

शिवराजेश्वर मंदिर :-

किल्ल्यातील मधल्या जागी शिवरायांचा मुलगा राजाराम याने आपल्या वडिलांचे स्मरणार्थ त्यांची प्रतिमा स्थापन केलेले हे श्री शिवराजेश्वरांचे मंदिर इ.स. १६९५ मध्ये बांधले आहे. येथील शिवप्रतिमा नावाड्याच्या रुपात वेषात आहे. भरघोस मिशा असणारी पण बिनदाढीची ही वेगळी शिवप्रतिमा आहे.

मंदीराभोवती नगारखाना व प्राथमिक शाळा बांधण्यात आली आहे. सध्या सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे सभामंडपात टाईल्स व मंदिराभोवती फरशी बसविली आहे. या मुर्तीच्या पूजाअर्चेची व्यवस्था सकपाळ घरण्याकडे आहे. दररोज पूजेनंतर मुर्तीस मुखवटा चढवतात. एक मुखवटा सोन्याचा व दुसरा मुखवटा चांदीचा आहे. मुर्तीजवळच एक तलवार म्यानासह ठेवलेली आहे. या म्यानवर एक बाजुला उड्डाण करणारा मारूती व दुसऱ्या बाजुला गरूड कोरलेला आहे. मंदीरात मारूती, गणपती, देवी त्याचप्रमाणे पाटगावच्या मौनीनाथ महाराजांची आसनस्थ मुर्ती व रामदास स्वामींच्या पादुका आहेत. मंदीरासमोर सुबक तुलसी वृंदावन आहे.

हनुमान घुमटी :-

मुख्य दरवाजा जवळच ही दगडातील दक्षिणमुखी महाबली हनुमानमुर्ती आहे. बलोपासनेचा संदेश देणाऱ्या समर्थ रामदास स्वामींच्या प्रेरणेतुन ही मुर्ती साकारली आहे.

किल्ल्यातील पाणीव्यवस्था :-

चारही बाजुंनी समुद्राचे खारे पाणी असताना मधेच असलेल्या कुरटे बेटावर मात्र मधुर गोड पाण्याचा साठा हे एक निसर्गाचे वरदानच आहे. यामुळे किल्ल्यावर रहाणे सुलभ झाले आहे. तिथे पिण्याच्या पाण्यासाठी त्यावेळी तीन विहीरींचे बांधकाम केलेले आहे. पाण्याचा अतिरिक्त साठा करण्यासाठी एक कोरडा तलाव बांधण्यात आला होता. सध्या यातील वापर पावसाळ्यात पिकवला जाणारा भाजीपाला व कपडे धुण्यासाठी होतो.

राणीची वेळा :-

राजारामानंतर मराठी राज्याची शकले झाली व हा किल्ला कोल्हापूरच्या ताराबाईंच्या अंमलाखाली गेला. करवीरची ही कर्तबगार राणी सहा महिने या किल्ल्यात येऊन राहिलीही होती. तिच्यासाठी समुद्रस्नानाची व्यवस्था तिथं केलेली होती. राणीची वेळा म्हणून ती जागा अजूनही किल्ल्यात दाखवली जाते. निशाणकाठी बुरुजाच्या पुढे असलेली छोटीशी चौपाटी '**राणीची वेळा** ' या नावाने ओळखली जाते. येथील रुपेरी वाळु मस्त आहे. पर्यटक तिथे उतरतात देखिल.

महादेव मंदिर :-

येथे महादेवाचे प्रतिक म्हणून पिंडी आहे. समोर नंदीची स्थापना केली आहे. मंदिरातच पिंडीसमोर एका विहिरीचे बांधकाम केलेले आहे. शिवकाळात लढाईच्यावेळी मावळयांसाठी असलेला भुयारी मार्ग या विहिरीतच लपवला असून तो मालवणपासून ५ कि.मी. अंतरावर ओझर येथील गुहेतून बाहेर पडतो. सध्या ओझर येथे स्वामी ब्रह्मानंद यांचे समाधी स्थळ आहे. गनिमी काव्याचे तंत्र बांधकामातूनही प्रगट होताना येथे दिसते. किती विचारपुर्वक सगळे काम .

किल्ल्याची तटबंदी व बांधकामाविषयी :-

किल्ल्याच्या अगदी जवळ जाईपर्यंत महादरवाजा दिसत नाही हे शिवकालीन किल्ल्याचं खास वैशिष्ट्य़. तटबंदी लपवलेल्या प्रवेशद्वारांमुळे शत्रुला चकवणं सोप व्हायचं.

किल्ल्याचे प्रवेशद्वार म्हणजे तत्कालीन स्थापत्यशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. दोन बाजुला उंच बुरुज आहेत. त्यामुळे अगदी जवळ जाईपर्यत तिथे प्रवेशद्वार आहे हे कळतच नाही. तटावर जाण्यासाठी ४५ जिने पहारेकऱ्यासाठी जवळ जवळ ४० शौचकुप बांधलेले आहेत. सध्या दुर्लक्षामुळे पश्चिमेकडील बाजूला ३० ते ३५ फूट कोसळला आहे.

किल्ल्याची तटबंदी मजबुत असुन एकुण ५२ बुरुज आहेत. तटातुन आतल्या बाजुने चालण्यासाठी ८ ते १० फुटी रस्ता वरील बाजुला आहे.



तटबंदी नागमोडी असुन शत्रुवर तोफा व बंदुका योग्य प्रकारे चालवुन युद्धास पुरक अशा प्रकारे झरोके केले आहे.

दूरवरील शत्रुच्या टेहळणीसाठी पश्चिमेला टेहळणी बुरुज व दक्षिणेला सुमारे ५० फूट उंचीचा दुसरा बुरुज आहे. किल्ला काबीज केल्यावर याच बुरुजावर ध्वज उभारला जात असे. यालाच ' **निशाणकाठी बुरुज** ' असे म्हणतात. युद्ध साहित्य हाताळणे व युद्धादरम्यान मोर्चे बांधणीसाठी योग्य ठरावे यासाठी किल्ल्याच्या प्रवेशमार्गावर व दक्षिणेकडे अशा दोन ठिकाणी

मुख्यतटाबाहेर सहाय्यक तट बांधला आहे. पहारेक़ऱ्यासाठी तटावरच चौक्या बांधल्या आहेत. तटबंदी मजबुतीसाठी पायात उकळते शिसे ओतले आहे. पाथरवट आसामी ५०, लोहार २००, गोवेकर पोर्तुगीज १०० आणि ३०० मजुर ३ वर्ष अखंड खपून १ कोटी होन इतका खर्च करुन हा किल्ला बांधला आहे. तटावरच प्रवेशद्वारजवळ उत्तरेकडील बाजूला चुन्यात उमटलेले शिवरायांचे उजव्या हाताचे व डाव्या पायाचे ठसे छोट्या घुमट्यात दिसतात. हे आमचे पहायचे राहुन गेले. पण तुम्ही मात्र जरुर पहा. खरेतर हा किल्ला बघण्यासाठी अगोदर तो वाचुन, समजुन आला पाहिजे. रामोजी शिंदे नामक गंवड्याने आपल्या कल्पकतेने महाराजांचे ओल्या चुन्यावर उमटलेले ठसे कायमस्वरुपी जतन करुन ठेवलेले आहेत. जो आजच्या काळात अमुल्य ऐतिहासिक ठेवा आहे. कोकणात होणाऱ्या अतिपावसाचा किल्ल्यातील रहिवाशांना व किल्ल्याला काही धोका पोहचू नये म्हणून जमिनीचा उतार तटबंदीच्या दिशेने केलेला दिसून येतो.

धार्मिक – सिंधुदुर्ग :-

छत्रपती शिवरायांच्या या किल्ल्यात हिंदू-मुस्लिम कुटुंबे ऐक्यतेच्या भावनेने पुर्वीपासून नांदत आहेत. सिंधुदुर्ग किल्ल्यामधील श्री शिवराजेश्वर देवस्थान व इतर पाच मंदिरे यामधे एकूण वर्षभरात १६ धार्मिक उत्सव साजरे केले जातात.यामधे रामनवमी, नारळी पौर्णिमा, नवरात्रोत्सव, मोहरम हे प्रामुख्याने आहेत.तसेच पारंपारिक उत्सवामधे होळीचा खांब मालवणातून खेळवत नेला जातो. तसेच श्री देव रामेश्वर- कांदळगाव येथील पालखी सिंधुदुर्ग किल्ल्यावर दर तीन वर्षांनी जल्लोषात सवाद्य मिरवणुकीद्वारे नेली जाते. नंतर महाराजांचे गुरु मौनीनाथ मंदिराकडे मेढा – मालवण येथे येते.

सद्यस्थिती :-

किल्ल्यात सेवेकर्यांची सुमारे १८ घरे आहे. येथील जमिनीस नांगर लावत नाहीत. त्यामुळे पावसाळ्यात भाजीपाला पिकवणे, नारळ विकणे, छोट्या प्रमाणात मासेमारी, स्टॉलद्वारे थंडपेयांची विक्री या द्वारे लोंकाचा उदर र्निवाह चालतो. दरवर्षी किल्ल्यावर लाखो पर्यटक व भाविक येतात. येथील **'किल्ला प्रेरणोत्सव समिती'** सारख्या काही समाजसेवी संस्था व राजकीय पक्ष किल्ल्याची साफसफाई या सारखी मोहिम राबवून जनजागृती करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पर्यटनाचे दृष्टीकोनातुन आधुनिकीकरण व सुधारणा :-

प्रसाधनगृह

किल्ल्यापाशी चांगली जेटी उभारणे

प्रशिक्षित गाईड तयार करणे

द्रुक्य श्राव्य कार्यक्रम

ऎतिहासिक दृष्ट्या प्रदर्शन

सिंधुदुर्ग किल्ला परिसरात बोटींगची सुविधा

आणि किल्ल्यावर फिरण्यासाठी बोटीवाल्यांनी जास्त वेळ द्यायला हवा. कारण एवढा किल्ला बघायला कमीत कमी दोन – तीन तास तर हवेत.

मालवण व परिसरातील महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळे

(अंतर बंदर जेटीपासुन)

रॉक गार्डन – १.५ किमी.

रॉक गार्डनच्या बाहेरच **'बांबु'** नावाचे प्रसिद्ध हॉटेल आहे. आम्हाला खास आमच्या मित्रांनी तिथे जायला सांगितले होते. गेलो तर खरेच भरपुर गर्दी होती. मांसाहारी लोकांची इथे चांगलीच चंगळ होते. सर्व प्रकारचे मासे इथे मिळतात. तुम्हीही अवश्य जा.

रामेश्वर मंदिर – १.५ किमी.

मौनीनाथ मंदीर – १ किमी.

सर्जेकोट- सुवर्णकडा– ४ किमी.

ओझर-ब्रह्मानंद स्वामी समाधीस्थळ–५ किमी.

रेवंडी – भद्रकाली मंदिर- ७ किमी.

बिळवस – जलमंदिर- १२ किमी.

हडी- साईमंदिर व कालिकादेवी मंदीर - १२ किमी.

धामापुर तलाव – १८ किमी.

हा मानवनिर्मित तलाव आहे. हा तलाव १५३० मध्ये बांधला आहे. तलावाचे पाणी स्वच्छ आणी निळेशार आहे. तलाव ५-७ एकरावर पसरलेला आहे. इथे बोटींगची सुविधा पण उपलब्ध आहे.

आंगणेवाडी येथील भराडी देवी मंदिर – १५ किमी.

उष्ण पाण्याचा झरा-आचरा (नागझरी) - २० किमी.

आचरा रामेश्वर मंदिर व बीच - २२ किमी.

इथे शंकराचे मंदिर आहे. ह्या गावात दर पाच वर्षांनी 'गावपळण' केले जाते. गावपळण बद्दल आपण मागे अमृता पांगे ह्यांचे प्रसिद्ध पुस्तक वाचलेच आहे.

वेतोबा देवस्थान आरवली : – श्री वेतोबा देवस्थानच्या समोरच सातेरी देवीचे मंदीर आहे. देवस्थानच्या वतीने भक्तांना रहाण्यासाठी म्हणून सुखनिवास येथे म्हणजे मंदिराच्या बाजुलाच सोय केली आहे. येथे ५ रूम असुन भाडे १२५ रूपये आहे. बुकिंगसाठी- ९३७३४७१९४९, ९७६५६६१७६१ ह्यांवर संपर्क साधु शकतो.

श्री देवी सातेरीमंदिर

पेंडुर - वेताळ मंदिर - २२ किमी.

रामगड किल्ला – ४० किमी.

कुडाळला पाट या गावी आम्ही मित्राच्याच घरी राहिलो होतो. त्याच्या घरासमोरच असलेली ही शाळा. त्याच्या घरी मस्त पाहुणचार घेतला. पाटवरून आम्ही मालवण किल्ल्याला जाताना आम्हाला एक छान ब्रिज लागलेला. त्यावर थांबुन मस्त फोटो काढले. कोकणाला कॅलिफ़ॉर्निया का म्हणतात ते आम्हाला आता समजलं. पाट गावामध्ये एक छानस तळं होतं. त्यामध्ये खुप सारे कमळ फुललेले होते. बाजुने सुंदर रस्ता आहे. फेरी मारायला मस्त वाटलं असतं पण वेळ कुठे होता.

मित्राच्या ताईच्याघरी गेलो तर तिथे त्यांची काजु फ़ॅक्टरी होती. कच्च्या काजुपासुन बाजारात मिळणारे काजु कसे बनतात ते बघितले. भरपुर काजु खाऊन त्यांचा पाहुणचार घेतला. तिथेच काजु खरेदी केली. घरचे काजु मिळाल्याचा आंनद झाला होता. काजुचा गर झाडावर असताना हा फोटो घेतला आहे.

तारकर्ली :- २० किमी.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हे एक हॉट डेस्टिनेशन आहे. येथिल कर्ली नदीच्या बॅकवॉटर मध्ये हाउसबोटींगची सुविधा केलेली आहे. जरासे महाग असले तरी ह्या बोटीत रहाण्याची मजा काही वेगळीच आहे. आणि तुम्हाला केरळला जाउन हाऊसबोटीत रहायला वेळ नसेल तर तुम्ही इथे तुमची हौस भागवु शकता.

' कर्ली ' आणि ' हिरण्येकेशी ' या दोन हाऊसबोटी आहेत. त्यावर निवासाची आरामदायी व्यवस्था आहे. त्याचप्रमाणे मोदकाचं जेवण किंवा मासे अशा खास कोकणी पदार्थाच जेवण हाऊसबोटीवर करुण मिळते.आणि थोड थ्रिल हव असेल तर बॅकवॉटरमधे वॉटरस्कुटरवरुन जोरदार राइड, बनाना राइड, स्पीड बोट, मोटर बोट असे सागरी क्रिडाप्रकार उपलब्ध आहेत.

मालवणचं गणेश मंदिर- हे जय गणेश मंदिर हे भक्तांसाठी आवर्जुन भेट देण्यासारखच ठीकाण. ज्योतिभास्कर जयंत साळगावकर यांनी बांधलेले. हे मंदिर मालवणनजिक मेढा येथे आहे. मंदिरातील गणेश मुर्ति सोन्याची आहे. त्यामुळे याला सुवर्ण मंदिरही म्हणतात. गणेशमुर्तीच्या दोन्ही बाजुंना रिध्दी- सिध्दी पहायला मि्ळतात. सिध्दीच्या हातात ढोल आणि तलवार तर रिध्दीच्या हातात पेन आणि कागद दिसून येतो. हॉलच्या छपरावर गणेशाच्या आठ

मुर्ती कोरलेल्या दिसतात. मंदिराची आतली सजावट अतिशय छान आहे. माघ महिन्यात गणेश जयंतीचा उत्सव मंदिरात पाच दिवस चालतो. मकरसंक्रातीच्या दिवशी सुर्याची किरणे थेट गणेशमुर्तीवर पडतात. आणि सोन्याची मुर्ती झळाळुन उठते हे इथले वैशिष्ट्य़.

श्री दत्त मंदीर क्षेत्र माणगाव :-

माणगावला परिसर एकदम छान आहे. आम्ही गेलो तेव्हा दुपारची वेळ झाली होती. तिथे मंदीरामध्ये रोज दुपारी भक्तांसाठी जेवण असते. तिथे जेऊन जरा आराम केला.

दत्त मंदिर


Dabhole
(Ganesh)
Talebazar
Devgad
Shirgaon
Nandgaon
Mithmumbari
Ilaye
Kumkeshwar
Main
Salshi
Sadanandgad
Savdav
Dhabibav
Kirjwade
Aare
Tambaldeg
Naringre
Bharni
Hindale
Pisekamte
Tarandale
Varvade
Nirom
Kank
Nagve
Kankavli
Mitbav
Budhavle
Munge
Cothare
Palsamb
Shirawan
Kirloo
Kasral
Ramgad Fort
Asrondi
Wagde
Aadbandar
Aachara
(Rameshwar)
Trimbak
Rathivde
Piravadi
Ovatiye
Bordve
Kalsuli
Watangeni
Hivale
Osargaon
Masure
Aangaanwadi
Bharadadevi
kasal River
Aambrad
Pokhran
Virsai
Kasal
Padve
Kunde
Tondavli
Wadacha Pat
Golwan
Bilwas
Jaimandir
Sindhudurg
Rly. Stn
Oras
Sindhunagari
Ozar
Bramhanand Swami
Math
Kandalgaon
(Rameshwar)
Bhalavnol
Yiravde
Kadawal
Sukalvad
Kolamb Backwater
Mahan
Nandos
Aamdos
Digas
Aavlegaon
Chivla
Ghumde
Katta
Talgaon
Humarmala
Hirlok
Malvan
Malvan
Virad

स्नार्कलिंग :

किल्ल्याच्या बाहेरच आजुबाजुच्या परिसरात उथळ जागा,नितळ पाणी, त्यातील चित्ताकर्षक अशा प्रवाळाच्या रचना, सागरतळाशी भरपुर जैवविविधता असल्याचे २००६ साली **लक्षात** आले. स्नार्कलिंग करुन पर्यटकांना ती पहाता येऊ शकते. तेव्हा एमटीडीसीने सांरग कुलकर्णी यांच्या सहाय्याने येथील अनेक स्थानिंकाना प्रशिक्षित केले. स्नार्कलिंग करण्यासाठी इथेच प्रशिक्षण घेतलेले स्थानिक तरुण पर्यटकांना मदत करतात. आम्ही गेलो तेव्हा माणशी तीनशे रुपये असा त्यासाठी दर होता. आमचे हे वेळेअभावी करायचे राहुन गेले. पुढ्च्या वेळी नक्की.



वेंगुर्ला :- येथे जेट्टी आणि लाइटहाउस आहे. लाइटहाउस उंचावर आहे. तिथुन समुद्राचे फार छान दर्शन होते. दुरवर पसरलेला समुद्र बघताना वेळ कसा जातो ते कळतच नाही. आम्ही पोहचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. आम्ही सुर्योदयाचे दर्शन घेतले. जेट्टीवर जातानाच बाहेर मासे विकणारे बसलेले असतात. वेंगुर्ला जवळ **फ्रुट रिसर्च सेंटर** आहे. हे सेंटर स्टडी सेंटर तसेच टुरीस्ट स्पॉट आहे.

सिंधुदुर्गाच्या सफारीसाठी किमान तीन-चार दिवसांचा अवधी हातात हवा.संपुर्ण भारतात एकमेव पर्यटन जिल्हा व आता एकमेव पेपरलेस जिल्हा म्हणुन सिंधुदुर्ग जिल्ह्याला एक मानाचे स्थान लाभलेले आहे. संपुर्ण बाराही महिने वाहणारा नापर्णे- शेर्पे धबधबा सिंधुदुर्गात आहे. अजुन सिंधुदुर्ग जिल्ह्यात आपल्याला खुप फिरायचे आहे. पण नंतर आपण आरामात फिरुया..एकाच वेळी किती फिरणार.

ई साहित्य प्रतिष्ठान

दक्षिण भारत हा भव्य मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. एका एका मंदिराची उंची, भव्यता आणि श्रीमंती पहात आणि ऐकत रहावी. म्हणून तर पर्यटक दक्षिणेची मंदिरं पहायला जातात. दक्षिणात्य लोकांना या मंदिरांचा फ़ार अभिमान आहे. काहीसा गर्वही. असायलाच हवा.

पण ती मंदिरं उत्तरेतहून आलेल्या आक्रमक वावटळीपासून सुरक्षित राहिली याचं श्रेय मात्र मराठी लोकांनी अभिमानाने घ्यायला हवं. मुघलशाही, कुतुबशाही , आदिलशाही अशा बड्या बड्या शाह्यांशी एक हाती मुकाबला करून आम्ही मराठ्यांनी तंजावर ते पेशावर

मराठेशाही स्थापन केली. आमच्या या किल्ल्यांनी आमच्या पूर्वजांनी एक संरक्षक भिंत उभी केली म्हणून दक्षिण सुरक्षित राहिली. सर्वच मराठी जण लढाईला गेले असतील असे नाही. पण काहींनी रसद पोचवली असेल. आणि काहींनी घाम गाळून दणकट किल्ले बांधले असतील. थोडे थोडके नाही तिनशेहून अधिक कडक किल्ले. शोभेचे नाही. रणकंदनी किल्ले. आमनेसामनेच्या युद्धात जिंकणं अशक्य असे किल्ले. प्रत्येक किल्ल्याची गुंतागुंतीची रचना. प्रत्येक किल्ल्याची वेगवेगळी शक्तीस्थानं. प्रत्येक किल्ला एक ऊर्जास्थान. एक शक्तीस्थळ. मुडद्यासारख्या मनालाही उभारी देईल असं. या किल्ल्यांचा आम्हाला गर्व आहे. हे किल्ले हे आमच्या तरुणांसाठी मंदिरंच आहेत. आई भवानीची शक्ती मंदिरं.

ई साहित्य प्रतिष्ठानने या प्रत्येक शक्तीस्थळाचं स्वतंत्र ई पुस्तक बनवण्याचं काम हाती घेतलं. म्हणता म्हणता हजार हात पुढे सरसावले. नचिकेत जोशीपासून सुरू झालेल्या या योजनेत माधुरी नाईक, अरविंद नाईक, पंकज घारे, ओंकार ओक अशा तरूण लेखकांच्या फ़ळीत

आता भास्कर नारकर, संकल्प चौधरी असे ताज्या दमाचे शिलेदार सामिल होत आहेत. या पुस्तिकांतून नव्या ट्रेकर्सना मार्गदर्शन तर होतेच पण विदेशात असलेल्या किंवा वयानुरूप ट्रेकिंगपासून दूर असलेल्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो. त्यामुळे या पुस्तिका फ़ार आनंदाने वाचल्या जातात.

या पुस्तिका प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचल्याच पाहिजेत. आम्ही त्यासाठी लाखों लोकांना या मेलने पाठवतो. पण कोट्यवधी मराठी लोकांपर्यंत त्या न्यायच्या तर त्यासाठीही हजार हात हवेत. तुमच्या ओळखीच्या तरूण मंडळींना या अभियानात सामिल करून घ्या. त्यांचे ई मेल पत्ते कळवा. त्यांना पुस्तके द्या. आता ही पुस्तके मोबाईलवरही वाचता येतात. www.esahity.com वरून डाऊन लोड करा. शिवाय नवनवीन apps येत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठानचं app लवकरच येत आहे.

मराठी ही केवळ भाषा नाही. ती एक वृत्ती आहे. एक परंपरा. एक वारसा. त्याचं जतन करूया. सर्व राजकारणापासून दूर राहून. पुढच्या पिढ्यांना या समृद्ध वारशाचा लाभ घेऊ द्या. त्यासाठी पैसे नकोत. फ़ार वेळही नका देऊ.

कृपया आपल्या ओळखीच्या दहा मंडळींचे ई मेल पत्ते कळवा. आमचे VIP सभासद होण्यासाठी एवढंच पुरेसं आहे.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com